दै पुण्यनगरी (8)

# उमेदवारांच्या गुन्हे व संपत्तीची माहिती मतदान केंद्राबाहेर झळकणार : सहारिया



नांदेड, दि.१३: नांदेड वाघाळा महानगरपालिकेची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या चल व अचल संपत्ती, त्यांच्यावरील प्रलंबित गुन्हे तसेच शिक्षा झालेल्या गुन्ह्याच्या माहितीचा संपूर्ण तपशील संबंधित प्रभागातील प्रत्येक मतदान केंद्राबाहेर १२ चौरसफूट आकाराच्या फ्लेक्सवर ठळकपणे दिसतील अशा पद्धतीने प्रदर्शित केला जाणार आहे. ज्यामुळे मतदान करण्यापूर्वी उमेदवारांची पार्श्वभूमी कळणे मतदारांना सोयीचे होईल. ही माहिती जाहिरातीद्वारे वर्तमान पत्रात प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त जे.एस. सहारिया यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

निवडणूक आयुक्त सहारिया यांनी बुधवारी सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जिल्ह्यातील ग्रामपंचायत निवडणूक तसेच महापालिकेच्या निवडणूक पूर्व तयारीचा आढावा घेतला. त्यानंतर दुपारी सह्याद्री विश्रामगृहावर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, पोलीस अधिक्षक चंद्रकिशोर मीणा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश देशमुख, उपजिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, अनुराधा ढालकरी, मनपा उपायुक्त रत्नाकर वाघमारे, संतोष कंदेवार यांची यावेळी उपस्थिती होती.

ज्येष्ठ नागरिक, महिला आणि द्विव्यांगासाठी शक्यतो तळमजल्यावर मतदान केंद्र ठेवून मतदान केंद्रावर रुग्णवाहिका व व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात येणार आहे.

मनपाच्या २० प्रभागांतील ८१ जागांसाठी ५३६ मतदान केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. एका प्रभागात सरासरी २५ ते ३० मतदान केंद्र आहेत. एकूण ३ लाख ९६ हजार ८७२ मतदार या निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावतील. निवडणुकीची प्रकिया पार पाडण्यासाठी ६० क्षेत्रीय अधिकारी, ७३० मतदान केंद्राध्यक्ष, २१९० मतदान अधिकारी, १५० महिला मतदान अधिकारी यासह पोलीस दलातील बळ मिळून एकूण ५ हजार अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली

▪पान २ वर

## व्हीव्हीपॅटबाबत अनिश्चितता

लोकसभा निवडणुकीत कोणत्या उमेदवारास मतदान केले, याची खात्री पटण्यासाठी व्हीव्हीपॅट (मतदानाचा पुरावा) मतदारांना दाखविण्याची व्यवस्था करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा निवडणुकीत कोणत्या उमेदवारास मतदान केले, याची खात्री पटण्यासाठी व्हीव्ही पॅट (मतदानाचा पुरावा) मतदारांना दाखविण्याची व्यवस्था करण्याबाबत निवडणूक आयोगाला सूचना केल्या आहेत. परंतु, महापालिका निवडणुकीत अशी कोणतीही व्यवस्था करण्याबाबत निर्देश नाहीत. त्याच बरोबर ही सेवा देणाऱ्या इसीआयएल कंपनीने अद्याप मशीनचा पुरवठा केलेला

▪पान २ वर

दै पुण्यनगरी (9)

# नांदेड मनपा निवडणुकीतील घटते मतदान चिंतेची बाब : सहारिया

नांदेड/ प्रतिनिधी

गत तीन निवडणुकांची मनपा निवडणुकीतील टक्केवारी ही घटलेली आहे. ही बाब चिंतेची असल्याचे राज्याचे निवडणूक आयुक्त जे.एस.सहारिया यांनी म्हटले आहे. त्यामुळे यंदाच्या मनपा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मनपा यंत्रणेला आपण योग्य ते निर्देश दिले आहेत, असेही सहारिया यांनी सांगितले.

येथील मिनी सह्याद्री विश्रामगृहातील पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, उपजिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी, अनुराधा ढालकरी, मनपा आयुक्त



गणेश देशमुख, पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मीना, मनपाचे उपायुक्त रत्नाकर वाघमारे, संतोष कंदेवार उपस्थित होते. सहारिया म्हणाले की, गत पंधरा वर्षांत झालेल्या नांदेड मनपाच्या निवडणुकीत अनुक्रमे ६०, ६३ व ५६ टक्केच मतदान झाल्याची आकडेवारी सांगत आहे. मनपासारख्या निवडणुकीत मतदानाचे प्रमाण वाढणे गरजेचे आहे. आता मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम, समाज माध्यमे, वृत्तपत्रे, डिजीटल मिडीयाच्या माध्यमातून मनपाने मतदानाचा टक्का वाढावा यासाठी मोठे प्रयत्न करावेत यासाठी आपण आयुक्तांना निर्देश दिले आहेत. यंदा तरी पूर्वीपेक्षा जास्त मतदान होईल अशी अपेक्षा आहे. मतदारांनीही आपला हा पवित्र मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे. त्यातून लोकशाही बळकट होण्यास मदत होत असते.

मतदान केंद्राबाहेर प्रत्येक उमेदवाराची पार्श्वभूमी, चलअचल संपत्तीतील फरकाचा फलक लावण्यात यावा, मतदारांना पोल चीट पूर्णपणे वाटप झाले पाहिजेत. दिव्यांग, ज्येष्ठ व महिला मतदारांसाठी विशेष व्यवस्था करावी असे निर्देशही त्यांनी मनपा व निवडणूक यंत्रणेला दिले आहेत, असे सहारिया म्ह...

दै पुण्यनगरी (9)

# निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत सहारिया समाधानी

नांदेड / प्रतिनिधी

ग्रामपंचायत व नांदेड मनपाच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त जे.एस.सहारिया यांनी येथे उच्चस्तरीय बैठकीत आढावा घेतला आणि यंत्रणेच्या व्यवस्थेबद्दल समाधान व्यक्त केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगणातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृहात ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणूक संदर्भात आढावा बैठक राज्य निवडणूक आयुक्त जे. एस. सहारिया यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने, जिल्हाधिकारी अरुण डोंगरे, पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर



मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे, मनपा आयुक्त गणेश देशमुख, अप्पर जिल्हाधिकारी संतोष पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी जयराज कारभारी आदी उपस्थित होते. राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यावर अधिकाऱ्यांनी भर द्यावा, असा सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. या निवडणुकासंदर्भात आयोगाने दिलेल्या सूचना नुसार कार्यवाही करावी. निवडणूक संदर्भातील कामात निष्काळजीपणा व कुचराई करणाऱ्या

अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही सहारिया यांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्थेसंबंधी आढावा घेताना वस्तू अथवा पैशाच्या स्वरुपातील प्रलोभनाला आळा घालणे, अवैध दारु वाहतुकीवर व वाटपावर नजर ठेवा, असे सांगून ते म्हणाले की, मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी व्यापक प्रमाणात मतदार जागृती मोहिम हाती घ्यावी. थेट सरपंच पदासाठी पहिल्यांदा मतदान होत आहे. बहुसदस्यीय (पान ३ वर..)

## निवडणुकीच्या पूर्वतयारीबाबत...

पद्धतीनुसार आवश्यक तेवढे मते देणे याबाबत देखील मतदार जागृती करण्यात यावी. दिव्यांग मतदारांना मतदान करता यावे यासाठी व्हीलचेअर, रॅमची व्यवस्था करणे, मतदान केंद्रे सर्व सुविधेने अद्ययावत व अधुनिक असावेत. लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या पद्धतीनेच या निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यावर भर दिला पाहिजे, अशा सूचनाही सहारिया यांनी दिल्या. यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे सचिव शेखर चन्ने म्हणाले की, निवडणुकीशी संबंधीत यंत्रणांनी अधिक सतर्क राहून निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडाव्यात. मतदार जागृती बरोबर मतदारांना व्होटर स्लीपचे वाटप करावे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरावयाचे असल्याने त्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात. सिंगल विंडो सिस्टीम सुरु करावी.

ग्राम पंचायत निवडणुकीसाठी मतदान केंद्रे निश्चित करण्यात आले आहेत. मतदान यंत्रेही पुरेसे आहेत, निवडणुकीसाठी अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत.अवैध मद्यविक्री व मद्यवाहतुकीस आळा घालण्यासाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी मतदान जनजागृती करण्यात येत आहे. ग्रामपंचायती निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन कटीबद्ध आहे, असेही अरुण डोंगरे यांनी सांगितले. मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका निवडणुक संदर्भात माहिती दिली. पोलीस अधीक्षक चंद्रकिशोर मिना यांनी निवडणूकविषयी आपल्या विभागाची माहिती दिली. प्रारंभी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सौ. अनुराधा ढालकरी यांनी प्रास्ताविक केले तर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक शिनगारे यांनी आभार मानले. या बैठकीस ग्रामपंचायत व नांदेड वाघाळा शहर महापालिकेचे निवडणुक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निरीक्षक, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, राज्य उत्पादन शुल्क, बॅंक, आयकर विभाग, पोलीस, वस्तु व सेवाकर विभाग, महावितरण आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.